**<u>आदेश</u>**

**कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय**
**विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.**
**दिनांक:- १५/१०/२००३**

क्रमांक-मत्स्यवि-१००२/(१४१)/पदुम-१४:महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम ५४), च्या कलम ४ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन उक्त कलम ४ च्या पोटकलम ३ अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, शासन याद्वारे निर्देश देत आहे की, न्यू फिश जेटटी (भाऊचा धक्का), माझगाव, मुंबई या विर्निदिष्ट क्षेत्रासाठी दुसऱ्या पाळीत सायंकाळी ४ ते ८ मध्ये अधिकच्या ५०० नवीन बोटींना परवाना अधिकारी उक्त अधिनियमातील कलम ६ मधील तरतूदीनुसार परवाने देतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(पी.पी.साबळे)
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन,